ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.V/Nov 2011pp.1-4

Research Paper

# कवी कुसुमाग्रज यांच्या 'अहि - नकुल' व कवी गोविंदसुत यांच्या 'वारूळातील युध्द' या कवितांचे तौलनिक दर्शन

प्रा.डॉ.सौ. जयश्री सातोकर
प्रगती महाविद्यालय़ भंडारा
जि. भंडारा ह्यमहाराष्ट्रह्

## *प्रस्तावना*

भंडारा जिल्हयातील लाखनी येथील समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय पोहरकर हे 'गोविंदसुत' या टोपणनावाने काव्यलेखन करतात. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव़ त्याच्यावरील श्रध्देपोटिच कवी केशवसुतांच्या परंपरेतील कवी गोविंदसुत हे नाव त्यांनी धारण केले. त्यांच्या कवितेने गाठलेल्या तत्त्वचिंतनाच्या विविधांगी पातळीमुळे त्यांच्या कवितांचे आशयविश्व हा खरोखरीच संशोधनाचा विषय ठरलेला आहे.

देव आंघोळीला गेलेॐ' व 'कलियुगातील धुतवारा' हे त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. प्रस्तुत ठिकाणी 'वारूळातील युध्द' या शीर्षकाच्या अत्यंत आशय संपन्न व अर्थदृष्टया उत्तरोत्तर अधिक प्रसरणशील ठरलेल्या कवितेचा शोध घेण्याचे प्रयोजन आहे. स्वतःच्या कवितेसंबंधी कलियुगातील ध्रुवतारा या त्यांच्या काव्यसंग्रहातील मनोगतात ते म्हणतात़ "माझ्या कवितेवर पूर्वासुरीच्या अनेक कवींचे निश्चितपणे़ संस्कार आहेत." त्यात त्यांनी कवी केशवसुत़ बालकवी़ कवी बी़ स्वातंत्र्यवीर सावरकऱ बा.सी. मर्ढेकर अशा अनेकांच्या कवितेने माझी कविता प्रभावित झाली आहे हे मान्य केले आहे. पण त्यांनी केलेल्या या उल्लेखात एक महत्त्वपूर्ण उल्लेख मला सुटलेला जाणवतो. टो म्हणजे 'कवी कुसुमाग्रजांचा' मला त्यांच्या कवितेवर असलेला कवी कुसुमाग्रजांचा प्रभाव महत्त्वपूर्ण वाटतो. हा प्रभाव या काव्यसंग्रहाचे प्रस्तावनाकार प्रा.कृष्णा चौधरी यांनी मात्र नेमकेपणाने टिपला आहे. ते म्हणतात़ "केशवसुत़ गोविंदाग्रज़ मर्ढेकऱ कुसुमाग्रज़ मुक्तिबोध व सुर्वे यांच्या कवितेतील जाणीवाचा ध्यासच त्यांच्या शब्दांसाठी आतूर झालेला दिसतो." या उल्लेखात कुसुमाग्रजांचा आवर्जुन उल्लेख आहे. व तो महत्त्वपूर्ण आहे. विशेषतः 'वारूळातील युध्द' या कवितेच्या संदर्भात तर हा विशेषच महत्वाचा आहे. ही कविता वाचतांना कवी कुसुमाग्रजांची 'अहि॔ नकुल' ही कविता चटकन आठवते. या कवितेत निसर्गातील अस्तित्त्वाच्या लढाईसाठी चाललेल्या एका युध्दाचे वर्णन आहे. साप आणि मुंगुस यांच्यातील दीर्घकाळ चाललेले घनघोर युध्द विषारी सर्पाच्या मृत्युने संपते. विषधारी अहंकाराने उन्मत्त झालेला नाग शेवटी पराभूत होतो. हा आशय रसिक मनावर प्रतिबिंबित होवूऩ पराभवानंतर त्या मरत सापाला गिळण्यासाठी शेकडो किटक त्याच्या सर्वांगावर जमा होतात़ व ही कविता विराम पावते. सदर कुसुमाग्रजांची 'अहि॔ नकुल' कविता वर्णनाच्या बाबतीत अत्यंत वीररसपूर्ण अशी आहे. 'स्वभावोक्ती' हा अहि॔ नकुल कवितेचा अलंकार आहे. आपणासमोर एक विलक्षण नाटयमय प्रसंग थरारत जातांना दिसतो. कुसुमाग्रजांच्या शब्दकळाही थोडया अधिक अलंकारिक झाल्या आहेत. त्या तुलनेत निश्चितच आशय व अभिव्यक्तीच्या अंगानेही 'वारूळातील युध्द' ही दीर्घ कविता चिंतनीय झाली आहे. 'अहि॔ नकुल' चा आशय 'व्यंजनेने' सूचित होतो. तर 'वारूळातील युध्द' अभिधेने आपला आशय सहज संस्कारित करते. जणूकाही या कवितेतून संघटित राष्ट्रजीवनाचे विजयशाली प्रबळ हुंकारच प्रतिध्वनित होतात. याही कवितेत निसर्गात चाललेले एक युध्द चीत्रत केले आहे. पण या युध्दाचा अन्वयार्थ अतिाय व्यापक व जणूकाही संकटग्रस्त युध्दामान राष्ट्राची प्रेरक शक्तीचे ठरलेले आहे. 'अहि॔ नकुल' मधील युध्द हे 'साप॔ मुंगुसाचे' तर 'वारूळातील युध्द' हे साप आणि मुंग्यांचे' आहे. साप आणि मुंगुस हे दोघेही थोडे तुल्यबल तरी वाटतात. पण वारूळातील युध्द मधील साप आणि मुंग्यांना युध्द हे तर एकदमच विषम स्थितीतील युध्द आहे. विषारी नागाच्या तुलनेत मुंग्यांना सऽप॔ सऽपा गिळून टाकणारा साप यांच्यातील शक्तीची कुठे तुलनाच होवू शकत नाही. परंतु मुंग्यामधील ऐक्याची भावना एका प्रबळ राष्ट्रशक्तीचे रूप घेऊन या कवितेतून व्यक्त होते.

अहि॔ नकुलची सुरूवार्त

'ओतीत विखारी वातावरणी
आग
हा वळसे घालित आला मन्थर
नाग़
मधुनिच उभारी फणा करी फूत्कार
ये ज्वालामुखिला काय अचानक जागॐ'

तर वारूळातील युध्दाची सुरूवार्त

'हे युध्द पेटले
वारूळ कुरूक्षेत्रीचे
तो नाग भयानक काळा
त्वेषाने फूत्कारी'

अशी आहे.

सुरूवातीलाच दोन कवितातील अंतर जाणवते. वारूळातील युध्दाला सुरूवात करण्यासाठी प्रस्तााावनेचा फापटपसारा नाही. तिथे सरळ कुरूक्षेत्रावरील युध्दच दिसते. 'अहि॔ नकुल' मधील युध्द सुरू व्हायला वेळ लागतो. सापाच्या आकमक भूमिकेतून आगमनाचे वर्णनच पहिले तीन कडवे चालते. व चवथ्या कडव्यात.

'टाकाली यमाने कटयार वा
कनकाची
चालली बळींचा वेध घेत ही
धुंदॐ'

तर वारूळातील युध्दामध्ये दुर्सयात कडव्यात मुंग्यांच्या वारूळावर आकमण करर्णाया सापाचे वर्णन उन्मत्त सापाच्या कौर्याचे दर्शन घडविते.

'तो करे चढाई
उन्मत्त करीत फूत्कार
तो क्षणात टोचून 'भू' ला
मुंग्यांचा फडशा पाडी'

हे वर्णन अभ्यासतांना अहि॔ नकुल प्रमाणेच याही कवितेत युध्दाचा चलचित्रपट वाचकाच्या दृष्टिसमोर खेळू लागतो.

'भिवविण्या कोटी मुंग्यांना

फूत्कारत फिरवी मान
हा कुणी विखारी शत्रू
कौर्याचे दर्शन घडवी'

येथील विषारी सापाच्या कौर्याची युध्दमान गतिमानता पुढे चित्रित होत जाते. खवितेच्या विषय प्रवेश चटकन होतो. तिर्सया कडव्यात

'सऽर्प सऽपा गिळूनी कितील्या
मुंग्यांचा घेई ग्रास
जणू ग्रहण लागले
मुंग्यांच्या राष्ट्रास'

असे वर्णन येते. 'सऽर्प सऽपा' या शब्दातून विषारी सर्पाच्या कौर्याची विलक्षण गतिमानता चित्रित होते. कवीने मुंग्यांचे वारूळ म्हणजे जणू मुंग्यांचे राष्ट्रच आहे. अशी कल्पना केली आहे. जणू काही विषारी नागाच्या बलशाली आकमणाने मुंग्यांच्या राष्ट्राला दुदैवी ग्रहण लागल्याचे संबोधले गेले आहे. इथे मुंग्याचे राष्ट्रजीवन हा आशय महत्त्वपूर्ण आहे. कारम प्रस्तुत कवितेचा मुख्य प्रतिपादय विषय हा ऐक्याची भावना टिकवून ठेवर्णाया देशासाठी सहजपणे हौतात्म्य पत्करण्यास सिध्द असर्णाया लढवैय्या विजिगिषू आकांक्षाचे चित्रण करणे हा आहे. ही आकांक्षा चवथ्या कडव्यात स्पष्टपणे दिसून येते.

'परी निर्भय सगळया मुंग्या
गर्जुनी देती ललकार
'बलशाली अमुचे आहे
मजबूत इथे सरकार'

येथील 'ललकार' आणि 'सरकार' हे साधल्या गेलेले यमक वीरश्रीपूर्ण आहे. मुंग्या आणि विषारी नागामध्ये घनघोर युध्द पेटले आहे. याचे वर्णन कवी सहज साध्या सोप्या शब्दातून करतो

'ती मुकी संघटित शक्ती
मग प्राणपणाने लढली
एकजूट होवूनी सगळी
खावया तयाला भिडली.

कुणी फोडीत डोळे त्याचे
कडकडा चावया सुटल्या
तो उन्मत्त विखारी साप
जेरीस येऊनी पडला.

होत्याचे नव्हते झाले
सर्वांगे मुंग्या भिनल्या
संकटी भयानक चिडूनी
बलशाली मुंग्या लढल्या

इथे 'अहिं नकुल' मधील शेवटले कडवे तुलनेसाठी लक्षणीय आहे.

'पिंजून कापसापरी पडे तो नाग
ते खंड गिळाया जुले कीटक भोतीॐ'

तर

'ते युध्द संपले तेव्हा
अस्थिंचे पंजर दिसले
त्या क्षुद्र जीवांनी कैसा
भयकारी सर्पा गिळले'

खरे तर वरील आशयावर 'अहिं नकुल' कविता संपूण जाते. वारूळातील युध्दाच्या विजयानंतर मात्र हा विजयोत्सव साजरा होतांना दिसतो.

'मग विजयसभा ती
मुंग्यांच्या दरबारी
कुनी नेता मग तो त्यांचा
विजयाने जयकारी'

इथे 'युध्दानंतरचा विजयोत्सव' पुढे येर्णाया पिढयांची प्रेरकशक्ती ठरतो. विजयी झालेल्या मुंग्या

'जयऽ जयऽ हो अमुचे
वारूळ राष्ट्र महान'

हे गीत अत्यंत त्वेषाने म्हणतात. विजयाचा आनंद शत्रूंचा तिरस्कार लढावय्येपणाचा जोश सर्वाच गोष्टी जणू एकत्र येतात. यासाठी कवी नेमकेपणाने म्हणतात.

'हे गति विजय क्रांतीचे
मेंदूत तयांच्या भिनले'

नुकत्याच अण्णा हजारेंच्या नेतृत्वात झालेल्या 'जनलोकपाल' विधेयकाच्या आंदोलनानंतर झालेली विजयसभा प्रस्तुत काव्यपंक्ती वाचल्यानंतर विशेपत्वाने प्रत्ययाला येते. त्या आंदोलनातील आणि विजय सभेतील घोषणाही जणू या कवितेत या आंदोलनाच्या अगोदरच मुखर झालेल्या दिसतात. राष्ट्राला 'माता' मानणारी आपली संस्कृती मुंग्यांच्या माध्यमातून अधिक प्रेमपूर्ण प्रखरतेने या कवितेत व्यक्त होतो. 'वारूळ राष्ट्र' हे त्यांचे मातेसम त्यांनी जपले

'ते राष्ट्र संघटित त्यांचे
ना कुणा कधीही बधले'

कवी पुढे त्यांच्या विजयापाठिमागचे तत्वज्ञान पुढे बोलको करतो. आपल्या आई इतकेच मातृभूमीवरील प्रेम व त्या प्रेमासाठी वाट्टेल ती किंमत मोजण्याची तयारी हेच त्यांच्या विजयाचे रहस्य आहे. हा सिध्दांत इथे मांडला जातो. म्हणूनच प्रस्तुत कविता संघटित बलशाली राष्ट्रजीवनाचा प्रेरक महामंत्र ठरते.

'रक्षिण्या मातृ 'भू' त्यांची
राष्ट्रप्रेम हृदयी जपले
विजयाचे उंच निशाण
मग कधीच नाही ढळलेॐ'

जणू इथे विजयाचे सहस्यच मांडले आहे. 'अर्थातरन्यास अलंकाराचा आधार घेत कवी पुढे सिध्दांत मांडतो.

'राष्ट्रप्रेम आदर्शाचे
वारूळ कृतिशील तेज
विळख्यात शत्रूच्या
जणू सुखाची शेज'

इथे इस्त्रायलचे उदाहरण दृष्टिक्षेपात येते. अरब राष्ट्राच्या आकमणकारी विळख्यात सापडलेले इस्त्राईल राष्ट्र केवळ राष्ट्रप्रेम आदर्शामुळे कसे संपन्न झाले आहे. हे उदाहरण चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आल्याशिवाय राहात नाही व पुढे या संघटित बलशाली लढवैय्या व हौतात्म्याच्या तेजाने कृतार्थ ठरलेल्या मुंग्यांचे विजयशाली राष्ट्रजीवन चित्रित करून कविता विराम पावते.

'ते साप विषारी
वसतात नवी जरी लाख
पण कळून त्यांना चुकले
हया मुंग्या लाख चलाख'

येथील 'लाख' आणि 'चलाख' ही यमके आणि कोटीकम विशेषत्वाने कवितेचे सौंदर्य वाढवितात. 'अहिं नकुल' चा शेवट हा उन्मत्त सर्पाच्या दुर्दशेचे चित्रण करून होतो. तर इथे मात्र स्वतःच्या परकमाने वैभवशाली सुखी राष्ट्रजीवन ओढून आनलेल्या मुंग्यांच्या राष्ट्रजीवन दर्शनाने होतो. तिथे फक्त सर्पाची अवदशा आहे. तर इथे सर्पाच्या अवदशेसोबतच मुंग्यांसारख्या क्षुद्र जीवांनी स्वतःच्या संघटित बलशाली लढाऊ व राष्ट्रीयदृष्टया चारित्र्यसंपन्न अशा मुंग्यांच्या वैभवसंपन्न जीवनाचे दर्शन घडडते. खवितेला आशयाच्या दृष्टीने एक वेगळेच सौंदर्य प्राप्त होते. अहिं नकुलपेक्षा या कवितेची अर्थ प्रसरणशीलताही अधिक व्यापक आहे. म्हणून कुसुमाग्रजांच्या अग्निसंप्रदायी परंपरेतील ही कविता कुसुमाग्रजांच्या नंतरच्या पिढीतील कवीची कविता म्हणून अधिक चार पावले समोर गेली आहे. इथे जणू कुसुमाग्रजांच्या अग्निसंप्रदायी परंपरेचा एक वेगळा विकास आणि सन्मान प्रत्ययाला येतो.

संदर्भ

1. कलियुगातील ध्रुवतारा

गोविंदसुत
डॉ . संजय पोहरकर लाखनी
प्रथमावृत्ती
मकरसंक्रांत
94 जानेवारी 2010

2 . रसयात्रा
कुसुमाग्रज
पुनर्मुद्रणे : 1989 2001
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
संपादक : बोरकर वैद्य

3 . इस्त्राईल छळाकडून बळाकडे
ना . ह . आपटे